जॉन लोगी बेअर्ड (1888-1946)

आणि इतर टेलिव्हिजन शोधक





जॉन लोगी बेअर्डचा नवनव्या शोधांमध्ये रस होता. शाळेत असताना, त्याने आपले घर आणि एका मित्राचे घर एका घरगुती टेलिफोन एक्स्चेंजने जोडले (त्याने टाकलेल्या तारा रस्त्यावर बऱ्यापैकी खाली लटकत होत्या). नंतर त्याला टेलिव्हिजनमध्ये रस निर्माण झाला.



आपणच पहिला टेलिव्हिजन बनवायचे, असे जॉनने मनाशी ठाम ठरवले होते. पण त्याने वापरलेली यांत्रिक पद्धत आजच्या इलेक्ट्रॉनिक पद्धतीपेक्षा निराळी होती. त्याच्या टिव्हीमध्ये फिरणाऱ्या तबकड्या होत्या. त्या लहान लहान चित्रे निर्माण करत. पैसे नसल्यामुळे जुने भंगार सामान वापरून त्याने हे यंत्र आपल्या स्वयंपाकघरात बनवले.



काही वेळा तबकड्या नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे खोलीत फुटलेल्या काचांचा आणि धातूंचा पसारा झाला. पण जॉनने आपले काम थांबवले नाही.



1925 साली लंडनमधील एका डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये जॉनने जगातील पहिल्या टेलिव्हिजनचे प्रदर्शन केले.



वर्षभरानंतर, संशोधकांचा एक गट जॉनच्या छोट्याशा स्वयंपाकघराबाहेर गोळा झाला. त्यांना जॉनच्या टिव्हीचे प्रात्यक्षिक बघायचे होते. सर्वांना प्रात्यक्षिक पसंत पडल्यावर जॉनने *ब्रिटीश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनला (बीबीसीला)* प्रायोगिक तत्वावर कार्यक्रम दाखवण्यास राजी केले.





दुर्दैवाने जॉनचा यांत्रिक पद्धतीने चालणारा टिव्ही फारसा बरा नव्हता. त्याचवेळी इतर अनेक शोधक इलेक्ट्रॉनिक टिव्ही बनवू पाहात होते. त्या टिव्हीवर चित्रे चांगली दिसत. 1922 साली *उटाह* राज्यातील एका शेतकऱ्याचा मुलगा, *फिलो टी. अर्नस्वर्थ*, याने ही इलेक्ट्रॉनिक पद्धती सुचवली होती. त्यावेळी त्याचे वय केवळ 14 वर्षे होते.



1926 साली जपानी शोधक, *केजिरो ताक्यानागी*, याने पहिल्या इलेक्ट्रॉनिक टेलिव्हिज़नचे प्रात्यक्षिक दाखवले. पण रशियन-अमेरिकी शोधक, *व्लादिमीर स्वॉर्कियन*, याच्या मदतीमुळेच हे शक्य झाले. त्याने चित्रे रेकॉर्ड करण्याची आणि ती पडद्यावर दाखवण्याची उपकरणे विकसित केली. आज आपण जो टिव्ही बघतो, त्याचा जन्म हा असा झाला. 1950 पर्यंत, टिव्ही घराघरांत पोहोचला. याचे संपूर्ण श्रेय अनेक शोधकांच्या अपार उत्साहाला आणि अथक मेहनतीला जाते..